# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2015) ( ISO/IEC 27001 : 2013)

४ था मजला, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९ खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

दू.क्र. : ०२२- २६४७१२५५ / २६४७०९१६ फॅक्स : ०२२-२६४७७२१७/२६४७३९८०

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/लले/का-४०(परीक्षा)/बी-६/२०१९/ ५३ दिनांक : 9 APR 2019

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी

I Scheme अभ्यासक्रम राबविणा-या संलग्नीत संस्था

विषय – **"I" Scheme अभ्यासक्रमातील पाचवे सत्रातील Industrial Training या विषयाबाबत..**

संदर्भ – १) मंडळाचे परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-५०/औ.प्र./२०१८/५६६५,दि.२१ऑगस्ट २०१८

२) मंडळाचे परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-५०/औ.प्र./२०१८/७२९८,दि.२६ ऑक्टोबर २०१८

३) मंडळाच्या २८ व्या विद्वत् समितीची बैठक दि.२९.०३.२०१९

मंडळाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त २९ अभ्यासक्रमांकरिता "I" Scheme अभ्यासक्रम लागू केला आहे. सदर पात्र अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या कौशल्य वाढीसाठी चौथ्या सत्रानंतर ६ आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण (Industrial Training) अनिवार्य करण्यात आलेले आहे. यासाठी ६ क्रेडीट व १५० गुणांची तरतूद करण्यात आलेली आहे. संस्थेने सदर प्रशिक्षणाचे आयोजन चौथ्या सत्राच्या Theory परीक्षेनंतर करावयाचे आहे असे संदर्भ क्र.(१) व (२) अन्वये कळविले होते.

Industrial Training या विषयाच्या परिक्षा व निकाला संदर्भात मंडळाच्या संदर्भ क्र.(३) येथे नमुद २८ व्या विद्वत् समितीच्या दि.२९.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत सदर बाबतीत सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

१. जे विद्यार्थी चौथे सत्र I Scheme मध्ये पूर्ण करतील अशा विद्यार्थ्यांकरीता ६ आठवड्याचे Industrial Training समाधानकारकरित्या पूर्ण करणे अनिवार्य राहील. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी सत्र १ ते ४ A/C/E/G ह्या जुन्या Scheme मध्ये पुर्ण केले असल्यास व I-Scheme मधील पाचव्या सत्राकरीता पात्र होत असतील अशा विद्यार्थ्यांना Industrial Training या विषयात सुट देण्यात येत आहे. तसेच अश्या विद्यार्थ्यांचा पाचव्या सत्राचा निकाल RG 7 (A) नुसार घोषित करण्यात येईल.

२ Industrial Training या विषयाकरिता पात्र असलेले I-Scheme मधील विद्यार्थी अपरिहार्य कारणास्तव Industrial Training समाधानकारकरित्या पूर्ण करु शकले नाही अशा विद्यार्थ्यांचा ५ व्या सत्राचा निकाल RHR ठेवण्यात येईल. संबंधित संस्थांनी अशा विद्यार्थ्यांची माहिती मंडळाकडून देण्यात येणा-या विशेष Link द्वारे भरणे बंधनकारक राहील. अशा विद्यार्थ्यांनी सहावे सत्र संपल्यानंतर Industrial Training पूर्ण करणे अनिवार्य राहिल. RHR निकाल ठेवण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे Industrial Training पूर्ण केल्यानंतर विहित पद्धतीनुसार मुल्यांकन करावे व विद्यार्थ्यांचा RHR असलेला निकाल जाहिर करण्याकरीता मंडळाकडे प्रस्ताव सादर करावा तदनंतर मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG ११ (G) नुसार कार्यवाही करुन सदर विद्यार्थ्यांचा निकाल जाहिर करण्यात येईल.

३ विद्यार्थ्यांनी Industrial Training पूर्ण केले आहे तसेच संस्थेने विद्यार्थ्यांचे Industrial Training या विषयाचे मुल्यांकन करुन PA व ESE चे गुण e-marksheet द्वारे भरलेले आहेत, परंतु विद्यार्थ्यांने ५ वे सत्राचा परिक्षा अर्ज कोणत्याही कारणास्तव भरला नसल्यास किंवा ५ वे सत्रात Detain झाला असल्यास सदर विद्यार्थ्याने Industrial Training पुन्हा करण्याची आवश्यकता नाही. यापूर्वी e-marksheet द्वारे Industrial Training या विषयाकरिता प्राप्त झालेले गुण ग्राह्य धरण्यात येतील.

संदर्भ क्र.(२) च्या परिपत्रकातील कार्यक्रम यादीतील मुद्दा क्र.(९) नुसार पाचव्या सत्राच्या Non-Theory e-marksheet उपलब्ध झाल्यानंतर Industrial Training या विषयाचे गुण सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. आता त्यामध्ये बदल करण्यात येत असून Industrial Training या विषयाचे मुल्यांकन झाल्यानंतर लगेचच विशेष e-marksheet link द्वारे गुण सादर करणे आवश्यक राहिल.

परीक्षा विभागा मार्फत Industrial Training या विषयाचे मुल्यांकन व गुण सादर करण्याच्या सविस्तर कार्यप्रणालीबाबत स्वतंत्र परिपत्रक काढण्यात येईल.

**उपरोक्त बाबी विचारात घेता विद्यार्थ्यांनी Industrial Training हे नियमित चौथ्या सत्रानंतर पुर्ण करणे आवश्यक आहे. Industrial Training पूर्ण न केल्यास होणा-या संभाव्य शैक्षणिक नुकसानास विद्यार्थी जबाबदार राहिल याची संस्थाप्रमुखांनी विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी. तसेच वरील प्रमाणे निर्णय व त्या अनुषंगाने कार्यवाहीबाबत विद्यार्थ्यांना अवगत करावे.**

( वि. र. जाधव )
प्र.सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई

प्रत माहिती व कार्यवाहीकरीता -

१. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद
२. पोर्टल व्यवस्थापक - संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

संगिता/Year-2019/Cicular 2019I(P-3/4)